# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३५१/२०२४ दिनांक १७/०९/२०२४

# प्रेस नोट

## “खुनाच्या गुन्हयातील आरोपीतास बिदर (राज्य - कर्नाटक) येथे मुळ गावी पळुन जात असतांना कल्याण येथुन ०६ तासाचे आत ताब्यात घेऊन, गुन्हा उघडकीस आणण्यात विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.’’

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.१३/०९/२०२४ रोजी पहाटे ०४:०० वा. ते ०४:३० वा.चे दरम्यान वावटेवाडी, फुलपाडा, विरार(पु.), ता. वसई, जि. पालघर येथे यातील तक्रारदार यांची मयत आई सौ. भारती गोपाळ राठोड, वय-३४ वर्षे, हि तीचे पती - गोपाळ राठोड, वय ३७ वर्षे, यास दारु पिण्याची सवय सोडण्यास सांगत असल्याचा राग येत असल्याने, तसेच मयत हिचे हिचे चारित्र्यावर संशय घेवुन, भांडण करुन त्यामध्ये मयत हिचे छातीचे खाली व पोटावर दोन ठिकाणी चाकुने वार करुन, तीस जिवे ठार मारले बाबत, तक्रारदार कु. प्रतिज्ञा गोपाळ राठोड,वय १४ वर्षे, हिचे तक्रारीवरुन विरार पो.ठाणे गु. रजि. नं. ८८७/२०२४, भारतीय न्याय संहिता - २०२३ चे कलम १०३ (१) प्रमाणे दि. १३/०९/२०२४ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

सदरचा गुन्हा हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने, लागलीच मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हयातील आरोपीताचा शोध घेण्याचा सुचना दिल्या. सदर गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेवुन, मा. वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शना प्रमाणे विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट दिली असता, नमुद गुन्हयातील आरोपीत हा त्याचे राहते घर सोडून पळुन गेले बाबत माहिती प्राप्त झाली. सदरची माहिती प्राप्त होताच आरोपीचे शोध तपास कामी वेगवेगळी पथके तयार करुन, आरोपीचे शोध तपासकामी रवाना केली. नमूद तपास पथकाने विरार रेल्वे स्टेशनवरील सी.सी.टि.व्ही मध्ये आरोपी विरार रेल्वे स्टेशन येथुन चर्चगेट बाजुकडे जाणाऱ्या ट्रेन मध्ये बसुन जात असल्याचे दिसुन आला. आरोपीचा सी.सी.टिव्ही फुटेजचे सहाय्याने मागोवा घेतला असतांना तो वसई रेल्वे स्टेशनवर उतरल्याचे दिसुन आले. वसई रेल्वे स्टेशन परिसरातील सी.सी.टिव्ही कॅमेरांची पाहणी केली असता आरोपी हा वसई-दिवा जाणाऱ्या ट्रेन (शेटल) मध्ये बसुन गेल्याचे दिसुन आले. आरोपी संदर्भात मयत हिचे नातेवाईकांकडे चौकशी केली असता त्याचे डोंबिवली परिसरात नातेवाईक राहत असल्याची माहिती मिळुन आली. आरोपीचे नातेवाईकांकडे विचारपुस केली असता तो त्याचे मुळ गावी जाणार असल्याची माहिती समोर आल्याने वरिष्ठांचे परवानगीने तपास पथक तात्काळ कल्याण येथे रवाना झाले. नमुद तपास पथकाने कोपर कल्याण येथे सापळा रचुन शिताफिने बिदर, कर्नाटक येथे पळुन जाण्याच्या तयारीत असतांना, अवघ्या ०६ तासाचे आत आरोपीस ताब्यात घेवुन, गुन्हा उघडकीस आणलेला आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोनिरी/प्रकाश मासाळ हे करत आहेत.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री. विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सुशिलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री.प्रकाश मासाळ, पोलीस निरीक्षक (प्रशासन), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, व उत्कर्ष सोनवणे, सर्व नेम. विरार पोलीस ठाणे, तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पोहवा/नामदेव ढोणे व पोअं/सोहेल शेख, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.



-----ooo-----